ISSN 2319-9318

UGC Sponsored

International Multilingual Research Journal

# Printing Area

Special Issue · March 2019

## ONE DAY INTERDISCIPLINARY INTERNATIONAL CONFERENCE

on

# MAHATMA @ 150

on

2nd March 2019



**Organized by**

**Gandhi Study Centre**

New Arts, Commerce & Science College,

Wardha, Maharashtra (India) - 442 001

ISSN 2319 9318

## Published and Chief Editor

**Dr. Prashant R. Kadwe**
Director (Gandhi Study Center)
New Arts, Commerce and Science College, Wardha

Lale Ramesh Warpudkar College, Sonpeth Pin-431516 Dist. Parbhani

**Printed By**
Harshwardhan Publication Pvt. Ltd. At. Post – Limbaganesh, Dist. – Beed
Pin Code – 431126 (Maharashtra)

### Advisory Board

Dr. R.G. Bhoyar
Dr. A B Sasankar
Dr. Shashi Poonam (IIP)
Dr. Rajiv Ranjan
Dr. Balraj Singh Brar(Patiyala)
Dr. Abhijit Verulkar
Piterson (London)
Dr. Banarjee (Kolkata)
Prof. Samiual Biswas (Asam)
Dr. Jesica (USA)
Dr. Prakash Shende
Prof Maroti Mane
Jesika(USA)
Nicolus Boin(France)
Piterson(London)
Dr. Karabi Mitra (Kolkata)
Dr. Shashi Poonam (HP)

### Board of Editors (Seminar Edition)

Dr. Saddi (Ludhiyana)
Dr. Prashant Kadwe
Prof. Dhanshri Parkhi
Prof Manish Bhoyar
Dr Neelakka Patil
Prof Kanchan Ingole
Prof Vaibhavi Ughade
Prof Sandip Petare
Dr Megha Sabane
Dr Latha Venkaaraman

**Date of Publication**
**2nd March 2019**

*Note: The Board of Editors may or may not be agree with the thoughts mentioned by individual writer in the souvenir. The concerning writer will be responsible in case of authenticity of his paper*

Varpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

74) स्वदेशी चळवळ
डॉ. कु. जयाश्री वि. कोकाटे अमरावती. 214

75) संविधानातील मूलभूत हक्क व कर्तव्ये
प्रा. सुरेश एम. पवार, पिपरी-वर्धा 215

76) महात्मा गांधी आणि स्वदेशी विचार
प्रा. प्रमोद वा. तडस ग्रंथपाल, वर्धा 217

77) महात्मा गांधीचे महिला विषयक विचार
डॉ. प्रमोद मा. आचेगावे, वर्धा 218

78) "महात्मा गांधी आणि असहकार आंदोलन"
प्रा. डॉ. राहुल वि. दखणे,पांढरकवडा 220

79) म.गांधीचा सत्याग्रह विचार
प्रा.डॉ.आंधळे बी.व्ही., सोनपेठ 222

80) महात्मा गांधी व असहकार चळवळ
प्रा.एस.एन. ठाकरे @ सहा.प्रा.नासीर कासम शेख सवना जि.यवतमाळ 224

81) महात्मा गांधीजी आणि अस्पृश्यता निवारण
प्रा. डॉ. सुजाता बळवंत सबाने सहयोगी प्राध्यापक, अमरावती 226

82) महात्मा गांधीच्या विचारांची उपयुक्तता
प्रा.डॉ.मानवते उत्तम हुसनाजी, हनेगाव ता.देगलूर जि.नांदेड 228

83) महात्मा गांधी यांची असहकार चळवळ
आरती प्रकाशराव भांगे, अमरावती 231

84) गांधीजींच्या पुनर्निर्माणकार्यात सामाजिक न्यायाची प्रतिमा
प्र. प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, वाशिम 233

85) महात्मा गांधीच्या स्वदेशी चळवळीचे ऐतिहासिक अध्ययन
प्रा.डॉ.प्रमोद रामेश्वर चव्हाण खामगांव जि.बुलडाणा (म.रा) 235

86) गांधी आणि खादी
प्रिया भिमराव कांबळे, अमरावती 237

87) महात्मा गांधीचे सत्याग्रही धोरण
प्रा.सौ.कांबळे एस.एस., हनेगाव ता.देगलूर जि.नांदेड 238

88) **महात्मा गांधी व निसर्गोपचार**
**डॉ. मनिषा विनायक शिरोडकर, सातारा** 242

बंगालमधील हजारो शेतकऱ्यांनी या आंदोलनात भाग घेतला. आसामातील चहाच्या मळ्यात काम करणाऱ्या मजुरांनी बंद पुकारला. मिदनापूर येथील शेतकऱ्यांनी युनियन बोर्डाचा कर देण्यास नकार दिला. उत्तर केरळातील मोपला शेतकऱ्यांनी जमिनदारांच्या विरुध्द असहकार आंदोलन केले. अशापध्दतीने संपूर्ण भारतभर असहकार आंदोलन तीव्र झालेले असतांना गोरखपूर जिल्ह्यातील चौराचौरी येथे हिसंक जमावाने पोलीस चौकीवर हल्ला करुन जाळपोळ केली. त्यात २२ पोलीस कर्मचारी मारले गेले. या घटनेने व्यथित होऊन महात्मा गांधींनी असहकार आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला.

**निष्कर्ष:-**

१) असहकार आंदोलन भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महत्वाचा टप्पा म्हणुन त्याकडे पाहावे लागते.
२) भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा राष्ट्रव्यापीपणा या आंदोलनामुळे साधला गेला.
३) महात्मा गांधींच्या नेतृत्वाचा प्रारंभबिंदु म्हणुन या आंदोलनाचे महत्त्व विशद करता येते.
४) भारताच्या ऐक्याला जोडणारा विधायक दुवा म्हणून या आंदोलनाकडे पहावे लागते.
५) भारतीयांमध्ये राष्ट्रप्रेम व स्वाभिमान चेतविणारा लढा म्हणुन या आंदोलनाचे महत्त्व ल ाात घ्यावे लागते.

**संदर्भ:-**

१) गांधी, मो.क.- सत्याचे प्रयोग- नवजीवन प्रकाशन मंदीर, अहमदाबाद-१४ फेब्रुवारी २००९
२) चंद्र, विपीन- आधुनिक भारत का इतिहास, ओरियंट ब्लैकस्वान, प्रा.लि. १/२४ आरफअली रोड,नई दिल्ली आ. २०१५
३) गाठाळ , प्राचार्य , डॉ. एस.एस. - आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, ँलास पब्ली. औरंगपूरा, औरंगाबाद , आ. जून २०१०
४) दी ाीत, नी.सी. भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन नागपूर

**79**

## म.गांधीचा सत्याग्रह विचार

**प्रा.डॉ.आंधळे बी.व्ही.**
राजशास्त्र विभाग
क.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ
मो. ९४२३४७२७५५

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

**प्रस्तावना :-**

राष्ट्रपिता महात्मा महामानव व अहिंसेचा पुजारी व बापू विविध नामाभिधानांनी सर्व जगाला परिचित असलेले मोनहदास करमचंद गांधी यांचा जन्म २ ऑक्टोंबर १८६९ रोजी पोरबंदर जवळील काठियावाड येथे झाला. म.गांधीचे सर्व जीवन समर्पित आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात म.गांधींनी वेगवेगळ्या माध्यमातून संघर्ष केला आणि भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. भारतीय इतिहासातील सर्वात प्रभावी व्यक्क्तमत्वापैकी एक व्यक्क्तमत्व असणाऱ्या म.गांधीवर आजवर विपुल लेखन झाले आहे.म्हणून त्यांच्या विचाराचे नाविन्य संपत नाही. म.गांधींनी खूले असे लिखण केंले नाही किंवा त्यांचा प्रचार व प्रसार केला नाही. पण त्यांच्या विचारांचा प्रभाव आजही सर्वत्र पहायला मिळतो.

विनोबा भावे, खान अब्दुल गफार खान, जयप्रकाश नारायण, नेल्सन मंडेला, पासून ते अण्णा हजारे यांच्या पर्यंतच्या सर्व संघर्षयात्रींनी मा.गांधीच्या सत्याग्रह विचाराचा आग्रह धरला आहे. म.गांधींना आदर्श मानून यांनी आपले लढे दिले आहेत. या संघर्षामध्ये म.गांधींच्या संत्याग्रह विचाराचा मोठा वाटा आहे. म.गांधींनी सत्याग्रहाचा जो विचार संपूर्ण जगाला दिला आहे. त्यामुळे अन्यायाचा प्रतिकार करणे सर्वसामान्य नागरिकाला शक्य झाले. अन्याय मग तो वैयक्क्तक स्वरूपाला असो की सामाजिक स्वरूपाचा त्याचा प्रतिकार करण्यासाठी सत्याग्रहाचा विचार महत्वाचा आहे. एकीकडे जगात शास्त्रास्त्रस्पर्धा, हिंसा मोठ्या प्रमाणात वाढत आहे. तर दुसरीकडे मानवाला शांतता, सुरक्षितता आवश्यक वाटत आहे. अशा परस्पर विरोधी परिक्स्थतीमध्ये म.गांधींचा सत्याग्रहाचा विचारच व्यवहार्थ ठरू शकतो. म्हणून मा.गांधींचा हा सत्याग्रहाचा विचार नेमका कसा आहे हे जाणून घेणे आजघडीला महत्वाचे वाटते.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Tq.Sonpeth Dist.Parbhani

**सत्याग्रह विचाराचा विकास :-**

सन १९०६ मध्ये म.गांधी एका खटल्याच्या संदर्भात दक्षिण अफ्रिकेला गेले. तेव्हा तेथील हिंदी लोकांवर तेथील सरकार अन्याय, अत्याचार करत होते. या अन्याय अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी म.गाधींनी चळवळ सुरू केंली. तेव्हा या चळवळीला त्यांनी `पॅसिव्ह सिझिस्टन्स`असे नाव दिले.त्यावेळी इंग्लडमध्ये स्त्रयांना मताधिकार मिळावा म्हणून सुधा `पॅसिव्ह सिझिस्टन्स` चळवळ सुरू करण्यात आली होती. त्यानंतर `इंडियन ओपीनियन्` मध्ये यावर चर्चा झाली. नेमकें या चळवळीला काय नाव द्यावे तेव्हा मगनलाल गांधी यांनी `सदाग्रह` असे नाव सुचविले. म.गांधीनी या `सदाग्रह` चे रूपांतर `सत्याग्रह` या नावात केंले `पॅसिव्ह सिझिस्टन्स` व सत्याग्रह यांच्यामध्ये मुळात खुप मोठा फरक आहे पण सत्याग्रहाची मुळ कल्पना ही अशी सूचली आहे.

**सत्याग्रहाचा अर्थ :-**

सर्वसाधारणपणे सत्याचा आग्रह धरणे म्हणजे सत्याग्रह होय. म.गांधी म्हणतात `ईश्वर म्हणजे सत्य असे म्हणण्याऐवजी `सत्य ईश्वर आहे` सत्याच्या आराधनेसाठी आपला जन्म, आपली प्रत्येक ृती व आपला प्रत्येक श्वास घेणे म्हणजे सत्याग्रह होय.

अमेरिकन विचारवंत थोरो यांनी सिव्हल व्हसओबिडियेन्स (सविनय अवज्ञा) चा जो विचार मांडला आहे . त्यालाच गांधींच्या भाषेत सत्याग्रह म्हणता येईल. म.गांधी लॉर्ड इंटर यांना सत्याग्रहाचा अर्थ सांगाताना म्हणतात.

हे असे आंदोलन आहे जे सत्यावर चालते आणि हिसेंशिवाय चालते. विनोदा भावे सत्याग्रहाचा अर्थ स्पष्ट करताना म्हणतात, ``सत्याग्रह केंवळ प्रतिकारपध्दती नाही. तर एक विशिष्ट जीवनपध्दती आहे. जिचा मुलाधार, सत्य, अहिंसा अपरिग्रह, अस्तेय, निर्भयता, सर्वधर्म समभाव व एकादशव्रत आहेत.``

सत्याग्रहांत व्रतस्थता, आत्मसंयम, आत्मशुध्दी आणि सत्याग्रह करण्याचा समाजमान्य दर्जा या गोष्टी अपेक्षित असतात. सत्याग्रही हा सदोदित साधुत्वाने असाधुत्वाला, प्रेमाने कोधाला, सत्याने असत्याला, अहिंसेने हिंसेला जिंकने सत्याग्रहात आवश्यक आहे. सत्याग्रहामध्ये संख्येला महत्व नसते तर गुणाला महत्व असते. सत्याग्रहाच्या बाबतीत ईश्वरावर श्रध्दा असणे आवश्यक असते. सत्याग्रहाचे एकमेव शस्त्र ईश्वर हे आहे. मग त्याला कोणत्याही नावाने ओळखा. भौतिक बळामुळे बहुतेक माणसे शरणागती पत्कारतात पण जो ईश्वराला आपला एकमेव रक्षणकर्ता मानतो जो जगातल्या महाबलाढ्य शक्तीपुढे सुध्दा वाकत नाही त्याला सत्याग्रही म्हणतात.

**सत्याग्रहीच्या पात्रता :-**

सत्याग्रहाचा अर्थ अत्यंत व्यापक असा आहे. सत्याग्रहीसाठी पुढील काही पात्रता व पथ्ये सांगितले आहेत.

१) सत्याग्रहीची ईश्वरावर जिती-जागती श्रध्दा असली पाहिजे कारण तोच एक त्याचा भक्कम आधार आहे.

२) सत्य-अहिंसेवर धर्म म्हणून त्याची श्रध्दा असली पाहिजे मनुष्यस्वभावातील मूलभूत सज्जनतेवर त्याचा विश्वास असला पाहिजे. या सज्जनतेलाच तो आपला सत्याचरणाने आणि आत्मक्लेशांच्या द्वारा प्रकट होणाऱ्या प्रेमाने जागृत करू इच्छितो.

३) सत्याग्रहीचे चारित्र्य निष्कलंक असले पाहिजे आणि उदिष्ठा प्रीत्यर्थ आपले प्राण आणि आपले सर्वस्व आनंदाने अर्पण करण्याची त्याची तयारी असली पाहिजे.

४) तो नित्य खादीधारी आणि सूत कांतणारा असला पाहिजे हा नियम हिंदुस्तानात अत्यंत आवश्यक आहे.

५) त्याला दारू किंवा इतर मादक पदार्थांचे व्यसन असता कामा नये तरच त्याची बुध्दी नित्य शुध्द राहिल, मन स्थिर राहील.

६) वेळावेळी शिस्तीचे जे नियम घालून दिले जातील ते त्याने राजीखुशीने अंमलात आणले पाहिजेत.

७) तुरूंगातले नियम जर ते मुद्याम त्याचा स्वाभिमान दुखविण्याच्या उद्देशाने केंलेल नसतील तर त्याने पाळले पाहिजेत.

**समरोप :-**

सत्याग्रह गांधी विचारातील ब्रम्हअस्त्र आहे. त्याचा वापर योग्य वेळीच केंला पाहिजे. तसेच सत्याग्रहाची ही संकल्पना अत्यंत व्यापक आहे. सत्याग्रहाच्या विचारात सत्य, अहिंसा, ब्रम्हचर्य, अस्वाद, अस्तेय, अपरिग्रह, श्रमप्रतिष्ठा, स्वदेशी,

अभय, अस्पृश्यता निवारण व सहिष्णुता यांना अत्यंत महत्व आहे.

उपवास, हरताळ, सविनय कायदे भंग, निरोधन, बहिष्कार, संप मोर्चे यांना साधन म्हणून मान्यता दिली आहे ही सर्व साधने अहिंसक वापरली पाहिजेत.

म.गांधीच्या सत्याग्रह विचाराचा प्रभाव संपूर्ण जगभर पहायला मिळतो. अमेरिकेंमध्ये नागरि अधिकार आंदोलनाचे नेतृत्व कारणारे मार्टिन ल्यूथर किंग, वर्णविरोधी आंदोलन चालविणारे दक्षिण अफ्रिकेंचे नेल्सन मंडेला, मॅनमारच्या लोकशाहीवादी नेत्या आसान सुची, अमेरिकेंचे उपराष्ट्रपती आलगोर यासारख्या विविध नेत्यांतवर म.गांधीच्या सत्याग्रही विचाराचा प्रभाव आहे. येणाऱ्या काळात जगाला शांतता, सुरक्षितता, प्रेम, सद्भाव यासाठी गांधीच्या सत्याग्रही विचाराशिवाय पर्याय नाही. दहशतवाद, वंशवाद, धर्मांधता, विषमता, अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार, पर्यावरणाचा ऱ्हास यासारख्या विविध समस्येवर म.गांधीचा सत्याग्रहाचा विचार प्रभावी उपाय आहे. समाजातील प्रत्येक माणसाने आपल्या दैनंदिन जीवनात सत्याग्रहाच्या विचाराचे अचरण केले तर संपूर्ण विश्वातून दु:ख नष्ट होईल.

**संदर्भ :-**


१) मंगल प्रभात - म.गांधी
२) बहुरूपी गांधी - अनु बंदोपाध्याय
३) गांधी विचार दर्शन सत्याग्रह विचार - प्रकाशन बाळासाहेब भारदे
४) मोहनदास - राजमोहन गांधी
५) लढा लोकमान्याचा उद्रेक आम आदमीचा - धनंजय बिजाले


*****

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

**80**

# महात्मा गांधी व असहकार चळवळ


**प्रा.एस.एन. ठाकरे**
(समाजशास्त्र विभाग प्रमुख)
श्री.विठ्ठल रुख्मीनी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सवना जि.यवतमाळ
मो.नं. ९५२७५५७९४९
Email : shankarthakare५७@gmail.com

**सहा.प्रा.नासीर कासम शेख**
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)
श्री.विठ्ठल रुख्मीनी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सवना जि.यवतमाळ
मो.नं. ९८२२४०१३८२
Email : nasir.sheikh३१३@gmail.com


## १) प्रस्तावना :-

सत्य व अहिंसेचे पुजारी असलेल्या महात्मा गांधींनी अनेक विषया संबंधी विवेचन केंलेले आहे. महात्मा गांधी असहकार आणि अहिंसेच्या तत्वावर आधारीत सत्याग्रहाचा उपयोग केला होता. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील प्रमुख नेते आणि तत्वज्ञ होते. महात्मा गांधींनी असहकार आंदोलनानी भारताला स्वातंत्र्य मिळवुन दिले होते.

अहिंसात्मक मार्गांनी स्वातंत्र्य मिळविण्यासाठी त्यांनी संपूर्ण जगाला प्रेरीत केंले होते. सुभाषचंद्र बोस यांनी इ.स. १९४४ मध्ये पहिल्यांदा त्यांना **"राष्ट्रपिता"** संबोधले होते.

प्रस्तुत प्रलेखामध्ये महात्मा गांधीजीच्या असहकार चळवळ याविषयी विचार मांडण्यात आलेले आहेत.

महात्मा गांधी यांचे विचार संपूर्ण जगामध्ये टिकून आहेत ही एक महत्वाची बाब समजल्या जाते.

## २) असहकार पर्व :-

इ.सन १९२० मध्ये लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर राष्ट्रीय चळवळीची सुत्रे ही महात्मा गांधी यांच्याकडे सोपविण्यात आलेली आहे.

महात्मा गांधींजीच्या प्रभावी नेतृत्वामुळे राष्ट्रीय चळवळ ही अधीक प्रभावी बनली आहे.